# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : 39EL / ग-१.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : 22 FEB 2026

## :: परिपत्रक ::

महाराष्ट्र विधानमंडळाचे **सन २०२६ चे पहिले (अर्थसंकल्पीय)** अधिवेशन सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी २०२६ **रोजी पासून** विधान भवन, मुंबई येथे सुरु होत आहे. **त्याअनुषंगाने या अधिवेशनात पुढीलप्रमाणे सुरक्षा व्यवस्थाविषयक कार्यपध्दती ठरविण्यात आली आहे.**

(१) **विधान भवनाच्या आतील आवारात कोणत्याही मान्यवरांना/अभ्यांगतांना शासकीय वा अशासकीय वाहनाने प्रवेश करता येणार नाही.**

(२) **विधान भवनाच्या गेट क्रमांक-१ जवळील मोकळ्या जागेत नेमून दिलेल्या ठिकाणावरच सर्व वाहने थांबविण्यात येतील व तेथून मान्यवरांना विधान भवन परिसरात व विधान भवनाच्या मुख्य पोर्चमध्ये चालत प्रवेश करावा लागेल.**

(३) विधान भवन परिसरात सर्व मान्यवरांच्या वाहनांची मुख्य प्रवेशद्वाराजवळील मोकळ्या प्रांगणात पार्किंग व्यवस्था (वाहनतळ व्यवस्था) खालीलप्रमाणे केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| पी-१ | : | **मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मा.सचिव-१, मा.सचिव-२, मा.सचिव-३ व मा.सचिव-४ महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.** |
| पी-२ | : | **मा.मंत्री, मा.राज्यमंत्री, मा.मुख्य सचिव, मा.अतिरिक्त/ अप्पर मुख्य सचिव** यांची वाहने |
| पी-२ मागील बाजू | : | **रुग्णवाहिका, अग्निशमन** वाहने, **वृत्तपत्र** व **दूरचित्रवाहिनी** (ओ.बी.) वाहने (एम एम आर सी ए च्या बॅरीकेट च्या आतील जागा (विधान भवन मार्ग) |
| पी-३ | : | **मुख्य सुरक्षा अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधिकारी (विधान भवन पोलीस चौकी** लगत रस्ता) |
| पी-४ | : | **महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य तसेच त्यांच्याकरीता या** सचिवालयामार्फत नियुक्ती केलेली वाहने (एम एम आर डी ए पार्कींग/ विधानभवन वाहनतळ ) |



\\१९२.१.२०.१३३\e\g१ backup\BUDGET SESSION २०२६\letter starting\paripatrak.doc

पी-५ : **मा.पीठासीन अधिकारी यांचे सचिव, मंत्रालयीन प्रधान सचिव/ सचिव तसेच विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच मान्यवरांच्या ताफ्यातील वाहने. (विधान भवन मार्ग युनियन बँकेसमोरील रस्ता)**

(४) विधान भवनात प्रवेश करताना गेट क्रमांक-१ मधून प्रवेश करण्याची व गेट क्रमांक-२ मधून बाहेर जाण्याची व्यवस्था केली आहे. त्याठिकाणी वाहन बोलविण्याची व्यवस्था (Car Calling System) करण्यात आली आहे.

(५) **मा.सदस्यांनी त्यांना 'विधानमंडळ सदस्य' म्हणून दिलेला बॅज सहजरित्या दिसेल अशा ठिकाणी लावावा.**

(६) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व संबंधितांनी ओळखपत्र/प्रवेशपास दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

(७) विधान भवन मुख्य प्रवेशद्वार (गेट क्रमांक-१) च्या उजव्या बाजूस तसेच मेट्रो स्टेशन जवळील प्रवेशद्वारावर वैयक्तिक सुरक्षा तपासणीसाठी एक्स-रे बॅगेज तपासणी यंत्रणा स्थापित करण्यात आली आहे. अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षा तपासणी पूर्ण झाल्यानंतर विधानभवन इमारतीत प्रवेश देण्यात येईल.

(८) मा.मुख्यमंत्री,मा.उप मुख्यमंत्री, मा.मंत्री/मा.विधानमंडळ सदस्य तसेच विभागाचे प्रधान सचिव, सचिव व वार्ताहर यांच्या वाहनासाठी प्रवेशपत्रिका 'ग-१' कक्षाकडून घेऊन त्या वाहनावर स्पष्ट दिसतील अशा लावण्यात याव्यात. सदर प्रवेशपत्रिका असलेल्या वाहनांनाच सुरक्षा विभागाने तपासणी केल्यानंतर विधान भवनासमोरील मोकळ्या परिसरात प्रवेश दिला जाईल.

(९) **विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वारातून फक्त खालील व्यक्तींना प्रवेश देण्यात येईल.**

(i) **मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद**

(ii) **मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा.**

(iii) **मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

(iv) **मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य.**

(v) **मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद,**

(vi) **मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा,**

(vii) **राज्य मंत्रीमंडळातील मा.मंत्री व राज्य मंत्री**

(viii) **दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.**

(x) **दैनिक वृत्तपत्रांचे व दूरचित्रवाहिन्यांचे संपादक व प्रतिनिधी.**

(xi) **विधानमंडळाचे सचिव-१, सचिव-२, सचिव-३, व सचिव-४ तसेच इतर अधिकारी/कर्मचारी.**

.. ३/-

(xii) मा.पीठासीन अधिकाऱ्यांचे सचिव, मा.उप पीठासीन अधिकारी यांचे खाजगी सचिव, विशेष कार्य अधिकारी, जनसंपर्क अधिकारी.

(xiii) मा.मंत्री महोदयांचे खाजगी सचिव, प्रत्येकी एक विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक व दोन शिपाई.

(xiv) मा.मुख्य सचिव/अतिरिक्त मुख्य सचिव, मंत्रालयीन विभागाचे प्रधान सचिव, सचिव, सह सचिव, उप सचिव व संबंधित विभागाचे विभाग प्रमुख व संचालक पदाच्या दर्जाचे वरिष्ठ अधिकारी.

(xv) मा.पोलिस महासंचालक, मा.पोलिस आयुक्त, मुंबई व वरिष्ठ पोलिस अधिकारी

(१०) अन्य प्रवेशपत्रिका धारकांना विधान भवनाच्या मुख्य प्रवेशद्वारालगतच्या दुसऱ्या प्रवेशद्वारातूनच प्रवेश दिला जाईल. स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असल्यानंतरच विधान भवनात प्रवेश मिळेल. तसेच प्रवेशपत्रिका घेवून विधानभवन इमारतीत अथवा परिसरात संबंधित प्रवेशपत्रिका धारकाने काही अनुचित प्रकार केल्यास अशा व्यक्तीचा प्रवेश पास जमा करुन त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल.

(११) विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करण्यासाठी अभ्यांगतांना ६ ते १२ महिन्यांसाठीचे प्रवेशपास वितरीत करण्यात आले आहेत. सदरचे प्रवेशपास अधिवेशन कालावधीकरीता सुरक्षेच्या कारणास्तव स्थगित करण्यात आले असून अशा पास धारकांनी सत्र कालावधीत त्या दिवसासाठी किंवा संपूर्ण सत्र कालावधीसाठी नव्याने पास घेणे आवश्यक आहे. सदरहू बाब मा.माजी विधीमंडळ सदस्यांच्या स्वीय सहायकांसही लागू राहील.

(१२) मा.मंत्री महोदयांचे खाजगी सचिव, प्रत्येकी एक विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक व दोन शिपाई यांना विधानमंडळाच्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर प्रवेश मिळेल.

(१३) मा.सदस्यांच्या एका अधिकृत स्वीय सहायकास फोटो ओळखपत्राच्या अधीन राहून विधान भवनात प्रवेश देण्यात येईल.

(१४) मा.मंत्री महोदयांच्या/मा.सदस्यांच्या अंगरक्षकांना तसेच, वाहनचालकांना विधान भवनात प्रवेश करता येणार नाही. त्यांच्यासाठी विधान भवन वाहनतळ (युनियन बँकेसमोरील मोकळया जागेत) उभारण्यात आलेल्या मंडपामध्ये त्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

(१५) अधिवेशन कालावधीत मा.मंत्रीमहोदयांना भेटण्यासाठी येणाऱ्या **शिष्टमंडळांना कोणत्याही परिस्थितीत विधानभवनामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.** अति आवश्यक शिष्टमंडळांच्या सदस्यांसाठी विधान भवनाच्या बाहेरील परिसरात युनियन बँकेसमोरील मोकळ्या जागेत मंडपामध्ये व्यवस्था केलेली आहे. मा.मंत्री महोदयांना त्याठिकाणी शिष्टमंडळाला भेटता येईल.

.. ४/-

(१६) **अधिवेशन कालावधीत मा.मंत्री महोदयांनी कोणत्याही प्रकारच्या शिष्टमंडळांना भेटीसाठी विधान भवनातील त्यांच्या दालनात न बोलविता मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात भेट घ्यावी.**

(१७) **अधिवेशन कालावधीत मा.मंत्रीमहोदयांनी विभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्याकडून माहिती अवगत करून घेण्यासाठी (ब्रिफिंगसाठी) विधान भवनातील त्यांच्या दालनात न बोलविता मंत्रालयातील त्यांच्या कार्यालयात बोलवावे.**

(१८) वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींना त्यांच्या वृत्तसंस्थेने दिलेले ओळखपत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने दिलेले अधिस्वीकृतीधारक ओळखपत्र (Press Accreditation Card) तसेच या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असल्यानंतर विधान भवनात प्रवेश मिळेल.

(१९) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींना त्यांच्या दूरचित्रवाहिन्यांनी दिलेले ओळखपत्र तसेच या सचिवालयाने दिलेल्या प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असल्यानंतर विधान भवनात प्रवेश मिळेल.

(२०) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या प्रतिनिधींची विधान भवन परिसरात नेमून दिलेल्या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली असून त्यांनी त्या जागेवरूनच चित्रीकरण करावे.

(२१) मोबाईल फोन, कॅमेरा किंवा इतर साधनांनी विधान भवन इमारत व विधान भवन परिसरात चित्रीकरण करता येणार नाही.

(२२) कोणत्याही प्रकारची प्रवेश पत्रिका घेवून विधान भवन आवारात प्रवेश केलेल्या व्यक्तीने काही गैरवर्तन केल्यास अशा व्यक्तीस विधानभवनाबाहेर काढण्यात येईल.

(२३) अत्यावश्यक सेवेतील वाहने उदा.मुंबई दूरदर्शन ओ.बी.व्हॅन, शासकीय रूग्णवाहिका, महानगरपालिकेचे स्वच्छता वाहन, शासकीय मुद्रणालयाचे लेखन व मुद्रण साहित्य घेऊन येणारी वाहने, उपाहारगृहासाठी लागणारे साहित्य, खाद्यपदार्थ, दूध, गॅस, सिलेंडर घेऊन येणारी वाहने या सर्व वाहनांना विधानमंडळाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेची तपासणी सुरक्षा विभागाने केल्यानंतर मेट्रो स्टेशन जवळील गेटमधून प्रवेश देण्यात येईल.

(२४) खाजगी दूरचित्रवाहिन्यांच्या ओ.बी.व्हॅनसाठी मंत्रालयासमोरील प्रशासकीय इमारतीच्या बाजूस असलेल्या मोकळ्या जागेत प्रवेश देण्यात येईल.

(२५) विधान भवन इमारतीमध्ये प्रवेश करतेवेळी सुरक्षा विभागाकडून केली जाणारी सुरक्षा तपासणी ही आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी असल्याने यासंदर्भात सर्व संबंधितांनी कृपया सहकार्य करावे.

(२६) विधान भवन मुख्य प्रवेशद्वारा समोर गर्दी होऊन अतिमहत्वाच्या व्यक्तींची गैरसोय होऊ नये यासाठी सुरक्षेच्या कारणास्तव विधानभवन मुख्य प्रवेशद्वाराच्या परिसरात चित्रिकरण करण्यास मनाई करण्यात आली आहे. सबब, अशा प्रकारे चित्रीकरण केल्यास संबधितांविरुध्द योग्य ती कारवाई करण्यात येईल.

वरील सुरक्षाविषयक सुचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

(रविंद्र जगदाळे )
उप सचिव
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रति,

(१) दोन्ही सभागृहांचे सर्व सन्माननीय सदस्य.

(२) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.

(३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव.

(४) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

(५) मा.उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.

(६) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद/ मा.उपाध्यक्ष महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

(७) मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/विशेष कार्य अधिकारी.

(८) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

(९) मंत्रालयातील विभागांचे सर्व अति.मुख्य सचिव, प्रधान सचिव/सचिव.

(१०) मा.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

(११) मा.पोलीस आयुक्त, मुंबई. यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी.

(१२) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.

(१३) मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघ, मंत्रालय, मुंबई

(१४) टी.व्ही.जर्नलिस्ट असोसिएशन, डी-बॅरेक, डी कामा, इनासमेन्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.

(१५) महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये, विधान भवन, मुंबई.

(१६) महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व अधिकारी व कक्ष.